**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - निखील नरेश साळवी

माझे वय - ३४ वर्षे,

व्यवसाय - हॉटेल

रा. - वायरी भूतनाथ कुभाटकरवाडी, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीम.हेरवाडे यांचे मार्फत.**

०१. दि.२९/०७/२०२४ रोजी मला मालवण पोलीस स्टेशन येथे मी येत असताना पोलीसांना मला बोलविले होते. पोलीसांनी माझया समक्ष कुठलाही पंचनामा केलेला नाही. माझ्या समक्ष कुठल्याही वस्तू जप्त केल्या नव्हत्या. आता मला अभिलेखावर दाखल असलेला पंचनामा दाखविणेत आला. त्यावर अनुक्रमांक २ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर काय लिहीलेला आहे हे मला माहीती नाही. साक्षीदारांनी त्यांची सही ओळखली म्हणून त्यांच्या सहीला निशाणी क्र. **पी१/ पी डब्ल्यु १** देणेत येते.

**साक्षीदार हा सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली त्यानुसार सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२९/०७/२०२४ रोजी पोलीसांनी मला गाव मौजे वायरी भूतनाथ येथे समुद्र किनारा येथे बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणे एक इसम हातात दोन बंदे पिशवी घेऊन संशयास्पद दिसून आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी संशय आल्यानंतर सदर इस्माची तपासणी केली. हे म्हणणे खरे नाही की, पडताळणी केल्यानंतर सदर इसमाच्या ताब्यात असलेले पिशवीमध्ये गोवा बनावटीचे हनी ब्लेंड प्युअर ब्रॅन्डी ने भरलेल्या १८० मिली च्या २८ बॉटल मिळून आल्या. हे म्हणणे खरे नाही की,

पोलीसांनी माझे समक्ष सदर मिळून आलेला मुद्देमाल जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष त्या इसमास नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सत्यवान गोपाळ पाटकर असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझे गाव एकच असल्याने मी त्याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा लागू नये म्हणून आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञा श्रीम. आर.ए.मोंडकर यांचे मार्फत.**

**आरोपीच्या वकिलांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

12/3/2025

एम्.के.फकीह
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण

ठिकाण : मालवण
दिनांक : १२/०३/२०२५